पुण्य नगरी

# हिप्परगा येथील विद्यालयात सायबर गुन्हे साक्षरता कार्यशाळा

**लोहारा :** तालुक्यातील हिप्परगा (रवा) येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यालयात सायबर गुन्हे साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हिप्परगा (रवा) येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यालयात सायबर गुन्हे साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी क्रांती वाघमारे यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी काय केले पाहिजे याचे सविस्तर मार्गदर्शन केले. वाढत्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यांचे स्वरूप, महिला व मुलींना फोटो मार्फ करून ब्लॅकमेलींग करण्याचे प्रकार कसे होतात, त्याचबरोबर फोन हॅकिंग, जीमेल हॅकिंग व इतर समाज माध्यम हॅक करून आर्थिक, शारीरिक आणि मानसिक फसवणूक कशी केली जाते याविषयी मार्गदर्शन केले. यापासून वाचण्यासाठी आपल्या मोबाईल, संगणक, लॅपटॉप व इंटरनेटचा आपण काळजीपूर्वक वापर केला पाहिजे, कोणालाही ओटीपी व आपली व्यक्तिगत माहिती देऊ नये, अनोळखी लिंक्स, वेबसाईट व अनोळखी व्यक्ती यांच्यापासून सावध राहण्याचे कौशल्य आपण आत्मसात केले पाहिजे असे आवाहन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एस. बी. भोईटे, बी. एस. स्वामी, जी.डी. मैंदाड, ए. व्ही. जाधव, एस. के. जाधव यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. जे. मनोहर यांनी केले.



Osmanabad Edition Edition
Sep 19, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com